International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 18 March - April - 2025

# आदिवासी विकास योजनेअंतर्गत शासकीय आश्रम शाळा समूह योजनेची पार्श्वभूमी

**नलिनी देविदास अंबुरे[1] व डॉ. निवृत्ती पिस्तूलकर[2]**

*[1]संशोधक*

*[2]मार्गदर्शक*

*स्व. राजकमलजी भारती कला वाणिज्य व*

*श्रीमती सु.रा. भारती विज्ञान महाविद्यालय आर्णी जिल्हा यवतमाळ*

***Corresponding Author –*** **नलिनी देविदास अंबुरे**

**DOI - 10.5281/zenodo.15245343**

**सारांश:**

*आदिवासी ही जमात भारतामध्ये वेगवेगळ्या डोंगर रांगेमध्ये आढळते. त्याचप्रमाणे जगामध्ये तसेच वेगवेगळ्या देशात ही आदिवासी जमात आढळते ही जमात वेगवेगळ्या देशात वेगवेगळ्या नावाने ओळखली जाते जसे युरोपमध्ये जिप्सी, आफ्रिका व आशिया खंडात आदिवासी म्हणून ओळख आपणास दिसून येते. भारतामध्ये लक्षद्वीप, अंदमान व निकोबार बेटे ओडिसा, छत्तीसगड, झारखंड, मध्यप्रदेश, राजस्थान, पश्चिम बंगाल, उत्तर पूर्व भारतात त्याचबरोबर महाराष्ट्र राज्यांमध्ये सातपुडा पर्वत, सह्याद्री डोंगररांग, बालाघाट व निर्मल डोंगररांग इत्यादी ठिकाणी आदिवासी समाज मोठ्या प्रमाणात आढळून येतो. आदिवासी समाज म्हणजेच त्या लोकसंख्येचा समूह जो देशातील विविध भागात प्राचीन काळापासून राहत आलेला आहे. त्यांना “वनवासी” किंवा “आदिवासी” असे म्हटले जाते. भारतीय आदिवासी समाज विविध प्रदेशांमध्ये विविध भाषा, संस्कृती, परंपरा आणि जीवनशैली चे पालन करतो. आदिवासी समाजाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची पारंपरिक जीवनशैली यामध्ये शेती, शिकार करणे, हस्त शिल्प आणि जंगल साधन संपत्तीचा उपयोग करून आपले जीवनमान जगतात. आदिवासी कोणास म्हणावे अशी काही शास्त्रज्ञांनी मते व्यक्त केलेली आहे. विल्यम नाईट यांच्या मते, “ज्या लोकांचे जीवन पद्धती लोकांपासून वेगळे आहे त्यांना आदिवासी मानले जाते.” त्यांच्या मते, आदिवासी समुदाय हे पारंपरिक जीवनशैलीचे पालन करणारे निसर्गाची निकट संबंध राखणारे लोक आहेत. आदिवासी समाजाचा इतिहास सामाजिक आणि आर्थिक संदर्भात अत्यंत महत्वपूर्ण आहे.*

*आदिवासी ओळखण्याचे निकष भौगोलिक वैयक्तिकता लाजरा स्वभाव, विशिष्ट बोलीभाषा, विशिष्ट संस्कृती व प्राचीन परंपरा एकनिष्ठता अशी आहे. त्याचबरोबर सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक व शैक्षणिक बाबींचाही महत्त्वाचा वाटा असतो वरील सर्व विचार करून भारतीय संविधानामध्ये आदिवासी करिता विशेष तरतुदी केलेल्या आहे.*

*या आदिवासी समाजाच्या शैक्षणिक विकासाकरिता 1972 मध्ये राज्य शासनाने आदिवासी आश्रम शाळेची स्थापना केली. यामध्ये पहिली ते बारावीपर्यंतचे शिक्षण आदिवासी मुलास मोफत दिले जाते.*

**शासकीय आश्रम शाळांची पार्श्वभूमी :**

आपल्या देशात स्वातंत्र्यपूर्वीपासून आदिवासी आश्रम शाळा अस्तित्वात आहेत. सर्वप्रथम थोर सामाजिक कार्यकर्ते ठक्कर बाप्पा यांनी दुर्गम भागातील आदिवासी मुलांच्या शिक्षणासाठी 1939 मध्ये आश्रम शाळांची स्थापना केली. तेव्हा आश्रम शाळांची रचना नई तालीम या शिक्षण पद्धती वर आधारित होती. शिक्षणासोबत विद्यार्थ्यांना व्यवसायिक शिक्षण सुद्धा दिले जात असे. भारताच्या स्वातंत्र्यानंतर सरकारने आदिवासी समाजाच्या शैक्षणिक आणि सामाजिक समिती साठी विविध योजना राबवल्या त्यातील महत्त्वाची योजना म्हणजे आश्रम शाळा समूह

योजना, पहिल्या पंचवार्षिक योजनेत 1951- 56 मध्ये आश्रम शाळांची संकल्पना पुढे आली. तेव्हा सर्व आदिवासी आश्रम शाळा ह्या शिक्षण विभाग अंतर्गत कार्यरत होत्या त्यानंतर 1975 -76 च्या सुमारास समाज कल्याण विभागाच्या अधिपत्याखाली होत्या. 1984 साली आदिवासी विकास विभाग अस्तित्वात आला तेव्हापासून ह्या शाळा या विभागाकडे हस्तांतरित करण्यात आल्या नंतरच्या काळात 2001 मध्ये स्वतंत्रसंहिता अमलात आली पण त्यातील काही त्रुटी लक्षात घेता 2003 मध्ये त्यात बदल करण्याचे काम हाती घेऊन 2004 - 05 मध्ये सुधारित संहिता तयार केली आणि ती संहिता 2006 -07 मध्ये अंमलात आली. एकूण या संहितेमध्ये शासकीय आश्रम शाळा व अनुदानित आश्रम शाळा यांचा समावेश आहे ही संहिता दर पाच वर्षांनी बदलण्यात येते. ही योजना आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावत आहे

**उद्देश :**

राज्यातील डोंगराळ दुर्गम भागात राहणाऱ्या लोकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी व त्यांची सामाजिक व शैक्षणिक प्रगती करण्यासाठी आश्रम शाळा हे मूळ केंद्रस्थान असावे हे या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

**प्रशासकीय रचना:**

आदिवासी विकास मंत्री- आदिवासी राज्यमंत्री-सचिव आदिवासी विकास विभाग-आयुक्त आदिवासी विकास विभाग-अतिरिक्त आयुक्त आदिवासी विकास विभाग-प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय-मुख्याध्यापक- शालेय स्टाफ अशी असते

आश्रम शाळेतील रचना - मुख्याध्यापक मुख्य असतो त्यांच्या खाली शाळा प्रशासन व वस्तीग्रह प्रशासन आणि लिपिक असतात. शाळा प्रशासनात शिक्षक प्रयोगशाळा सहाय्यक व शिपाई पहारेकरी असतात, वस्तीगृह प्रशासनात अधीक्षक स्वयंपाकी बहुउद्देशीय कर्मचारी असतात.

**उद्दिष्टे :**

1) आदिवासी मुलांना मोफत उत्कृष्ट व दर्जेदार शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणे.
2) पुरेसा सकस व दर्जेदार आहार पुरवणे.
3) नियमित आरोग्य तपासणी व वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देणे
4) खेळाडू वृत्ती व सांस्कृतिक कलागुणांचे विकासासाठी योग्य मार्गदर्शन व संधी उपलब्ध करून देणे.
5) व्यवसायिक व रोजगार कौशल्य निर्माण होण्यास मार्गदर्शन करणे.
6) सांस्कृतिक वारसा जतन करण्यासाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणे.
7) राहण्यासाठी सुरक्षित, स्वच्छ वातावरण उपलब्ध करून देणे.
8) विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, मानवी मूल्य व भारतीय संविधानातील मूल्य रुजवणे.
9) शाळांचे पारदर्शी व लोकाधिकारीत व्यवस्थापन करणे.
10) विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक सामाजिक आणि आर्थिक विकासाला गती देणे.
11) विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षणाचे संधी उपलब्ध करून देणे.
12) आपला समाज गाव व देश यांच्या विकासामध्ये योगदान देण्यास विद्यार्थ्यांना तयार करणे.

**आश्रम शाळांचे मंजुरी निकष:**

डोंगराळ भागामध्ये 5000 ते 7000 लोकसंख्या वस्तीसाठी एक आश्रम शाळाआणि दुर्गम भागात 2000 ते 3000 लोकसंख्येसाठी एक आश्रम शाळा मंजूर करण्यात येते.

**आश्रम शाळांची संख्या:**

महाराष्ट्र मध्ये आदिवासी विकास विभाग अंतर्गत एकूण 552 शासकीय आश्रम शाळा मंजूर आहेत त्यापैकी आदिवासी उपयोजना क्षेत्रातील 412 आहेत व उपयोजना क्षेत्र बाहेरील 140 आहेत. पण मंजूर पैकी 529 शाळा सध्या कार्यरत आहेत या 529 शाळांपैकी 25 कन्या शाळा आहेत आणि 11 इंग्रजी माध्यमाच्या शाळा आहेत

**आश्रम शाळेत पुरविण्यात येणाऱ्या सोयी सुविधा:**

1) शिक्षण - इयत्ता पहिलीपासून ते बारावीपर्यंत मोफत शिक्षण आणि काही ठिकाणी तांत्रिक शिक्षण आणि व्यवसायिक प्रशिक्षणही दिले जाते व तसेच विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती ही प्रदान केली जाते. आश्रम शाळेत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यामध्ये पाठ्यपुस्तके व लेखन सामग्री देण्यात येते.
2) भोजन - आहारामध्ये त्यांना अन्नधान्य, मसाले, किराणामाल, दूध, अंडी, फळे, केळी इत्यादी साहित्य पुरविण्यात येते.
3) निवासी सुविधा- मोफत वस्तीगृह आणि दैनंदिन सामानामध्ये त्यांना खोबरेल तेल, अंघोळीची व कपड्याची धुण्याची साबण टूथपेस्ट, टूथब्रश, सॅनेटरी नॅपकिन, बूट पायमोजे, रेनकोट, शालेय गणवेश कपडे पुरविण्यात येतात.
4) आरोग्य सुविधा - नियमित आरोग्य तपासणी मोफत आरोग्य सुविधा.

**शालेय व्यवस्थापन समिती:**

शाळेचे दैनंदिन व्यवस्थापन करण्यासाठी आणि शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी व त्यावर सनियंत्रण ठेवण्यासाठी आश्रम शाळांमध्ये शालेय व्यवस्थापन समितीची स्थापना करण्यात येते त्यानुसार या समित्यांमध्ये अध्यक्ष सहित 75 टक्के सदस्य पालकांमधून निवडलेले जातात सदर शाळा व्यवस्थापन समित्यांना आश्रम शाळांच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करून देण्यात येतो.

**आदिवासी आश्रम शाळेतील सद्यस्थिती आणि आव्हाने :**

1. **पायाभूत सुविधांची अपूर्णता:** आज घडीला देश स्वातंत्र्याचे 75 वर्ष साजरा करत असताना दुसरीकडे आदिवासी आश्रम शाळेची दुरावस्था आपणास दिसून येते, अजूनही शाळांमध्ये पायाभूत सुविधांची पूर्तता झालेली दिसत नाही त्यामुळे या योजनेची उद्दिष्टे साध्य होताना दिसत नाहीत.
2. **अपुरा कर्मचारी वर्ग:** कर्मचारी वर्गांच्या आपूर्ततेमुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासात कमतरता येते व शाळेचे योग्य व्यवस्थापन करण्यात पण अडथळे येतात
3. **गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा अभाव:** अपुरा कर्मचारी वर्ग आणि कर्मचाऱ्यांच्या अनियमिततेमुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर गंभीर परिणाम होत आहेत त्यामुळे विद्यार्थ्यांना गुणवत्ता पूर्ण शिक्षण मिळण्यास कठीण होत आहे
4. **स्वच्छ आणि शुद्ध पाण्याची अपूर्णता:** आज घडीला आरोग्याच्या दृष्टिकोनातून पाहिले तर 50% रोग हे दूषित पाण्यामुळे होणारे आहेत त्यामुळे शाळांमध्ये शुद्ध व स्वच्छ व आरो पाणी पुरविणे गरजेचे आहे परंतु आदिवासी आश्रम शाळेमध्ये अशा व्यवस्थांच्या कमतरतेमुळे विद्यार्थ्यांमध्ये रोगराईचे प्रमाण वाढलेले दिसून येते.
5. **निवासी कर्मचारी निवासी न राहणे:** आश्रम शाळांमध्ये बऱ्याच कर्मचाऱ्यांना निवासी राहणे अनिवार्य असते परंतु आज घडीला आदिवासी शाळा ह्या ग्रामीण भागात असल्यामुळे बरेच कर्मचारी निवासी राहत नाहीत तो तालुका किंवा जिल्ह्याचे ठिकाणी राहतात म्हणून कर्मचारी निवासी स्थानी ओस पडलेली दिसून येतात. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण होतो. व तसेच जर महिला अध्यक्ष निवासी राहत नसतील तर शाळेतील मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण होऊन बऱ्याच शाळांमध्ये मुलींसोबत गैरप्रकार झालेले आढळून येतात

6. **प्रशासनाचे दुर्लक्ष:** आदिवासी आश्रम शाळा ह्या आदिवासींच्या विद्यार्थ्यांसाठी म्हणजेच मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी असल्यामुळे बरेच कर्मचारी वर्ग व शिक्षक या शाळांकडे निकृष्ट दृष्टीने पाहत असतात त्यातून त्यांची आदिवासी विद्यार्थ्यांना शिकवण्याबाबतची उदासीनता दिसून येते व इतर कर्मचाऱ्यांकडून सुद्धा कामचुकारपणा आणि विद्यार्थ्यांबद्दल उदासीनता दिसून येते तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून सुद्धा या बाबींकडे दुर्लक्ष होताना दिसते
7. **वाढता ड्रॉप आउट रेट** : वरील सर्व समस्यांमुळे आदिवासी विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबद्दलची गोडी कमी होत आहे आणि गोडी असूनही गुणवत्तापूर्ण शिक्षण भेटत नसल्यामुळे व तसेच पायाभूत सुविधांचा अभाव असल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये ड्रॉप आऊट रेट वाढत आहे व बरेचसे विद्यार्थी शाळा सोडून घरी राहणे पसंत करत आहेत.

**उपाय :**

1. **प्रशिक्षण आणि गुणवत्ता सुधारणा:** शिक्षकांचे नियमित प्रशिक्षण आणि त्यांच्या कौशल्याची सुधारणा अत्यंत महत्त्वाची आहे. यामुळे ती विद्यार्थ्यांना उत्तम मार्गदर्शन करू शकतात.
2. **पाठ्यक्रम अद्यावत करणे:** शाळेतील पाठ्यक्रम आणि शिक्षण पद्धतीचे आधुनिकीकरण करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या रुचीनुसार किंवा स्थानिक आवश्यकता लक्षात घेऊन अभ्यासक्रम तयार करणे.
3. **संसाधनांची उपलब्धता:** शाळांमध्ये आवश्यक साधन संपत्ती, पुस्तकांची पूर्तता, संगणकाची सुविधा, विज्ञान प्रयोगशाळा इत्यादी उपलब्ध करून ज्यामुळे विद्यार्थ्यांना एक उत्तम शिक्षण मिळेल.
4. **शालेय कार्यक्रम व सांस्कृतिक कार्यक्रम:** विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी शालेय सांस्कृतिक क्रीडा आणि कलाक्षेत्र कार्यक्रमाचे आयोजन करणे.
5. **मूल्य आधारित शिक्षण:**विद्यार्थ्यांना नैतिक शिक्षण देणे जेणेकरून ते आपल्या समाजात नागरिक म्हणून विकसित होऊ शकतील.
6. **टेक्नॉलॉजीचा वापर:** डिजिटल शिक्षण साधनांचा वापर करून आंतरराष्ट्रीय स्तरावर शिकवणीची संधी देणे
7. **प्रकल्प कार्यालयाचा हस्तक्षेप:** प्रकल्प कार्यालय तर्फे भरारी पथके स्थापन केली पाहिजे व आश्रम शाळांच्या शैक्षणिक गुणवत्तेची व सर्व सुविधांची वेळोवेळी तपासणी केली पाहिजे.
8. **पालकांचा सहभाग:** पालकांनी व शालेय समिती त्यांनी सुद्धा शाळेच्या गुणवत्तेकडे आणि सोयी सुविधांकडे लक्ष दिले पाहिजे. तसेच वेळोवेळी पालक मीटिंग घेऊन समस्यांच्या निराकरणाचे उपाय शोधले पाहिजेत.

या उपायामुळे नक्कीच शाळेतील समस्या दूर होतील व योग्य धोरणे आणि प्रयत्न केल्यास हा समाज लवकरच मुख्य प्रवाहात येऊन विकासाच्या मार्गावर पुढे जाऊ शकतो.

**निष्कर्ष :**

शासकीय आदिवासी आश्रम शाळा या आदिवासी समाजाच्या शिक्षणासाठी खूप महत्त्वाच्या आहेत त्यामुळे शासनाने याकडे विशेष लक्ष देऊन वरील समस्यांचे योग्य रीतीने निराकरण करून शिक्षणाची गुणवत्ता सुधारणे गरजेचे आहे आणि अशा अनेक सुविधा पुरवून त्यांचा अधिक विकास करणे गरजेचे आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

1. आश्रम शाळांची नियमावली आणि कार्यपद्धतीची माहिती देते. (Tribal. Maharashtra.gov.in): आश्रम शाळा संहिता
2. आदिवासींसाठी विविध योजना हा लेख आदिवासी साठ्यांच्या विविध शैक्षणिक योजनांची

माहिती प्रदान करतो (Social welfare. Wikipedia.in)
3. आदिवासी शिक्षण समस्या आणि उपाय: डॉ. व्ही. एस. फाटक १९८५ "लोकायत प्रकाशन"
4. आदिवासी विद्यार्थ्यांची शाळा आणि समाजातील स्थान: डॉ कृष्णा श. जोशी १९८५ प्रकाशन वर्ष "लोकवाणी प्रकाशन"
5. आदिवासी आश्रम शाळा योजना: एक आढावा आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन
6. आदिवासी समाज आणि शिक्षण: शं. ना. नवरे १९६१ "प्रकाशन साहित्य"
7. शासकीय आश्रम शाळा चा आदिवासी समाजावर होणारा: प्रभाव प्रकाश देसाई १९८८ प्रकाशन वर्ष "महा. प्र. प्र. समिती" द्वारे